MHPU180023702022

नियमित दिवाणी दावा/ ४१३/२०२२

**मनिषा प्रमोद शितोळे वि.. विठ्ठल शिवाजी शेलार**

नि.क्र. **६९** वरील आदेश

**(पारित दि. ११/०६/२०२६)**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.४ ज्ञानदेव रामराव शितोळे यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेट असाईड करुन मिळण्याकामी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल केले नाही परंतु, युक्तीवादामध्ये हरकत नोंदवली.

०२. वादी यांच्या कथनाप्रमाणे दाव्यातील प्रतिवादी क्र.४ ज्ञानदेव रामराव शितोळे यांचे दिनांक १२/११/२०२५ रोजी निधन झाले असून त्यांच्या वारसांविरुध्द दाव्यास कारण पुढे चालू आहे, त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. वारस मुदतीमध्ये अभिलेखावर न घेतल्याने प्रतिवादी क्र.४ ज्ञानदेव रामराव शितोळे विरुध्द दावा अबेट झाला आहे. सदर अबेटमेंटचा आदेश देखील रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. प्रतिवादी यांनी सदर अर्जास युक्तीवादामध्ये विरोध दर्शविला व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व अभिलेखाची पाहणी केली. वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेले नि.क्र. ७६ सोबतचे मृत्युप्रमाणपत्रावरुन प्रतिवादी क्र.४ ज्ञानदेव रामराव शितोळे यांचे दिनांक १२/११/२०२५ रोजी निधन झाल्याचे सिध्द होते. वादी यांच्या कथनानुसार वारस अभिलेखावर घेण्यास उशिर झाला. वादी यांनी अर्जामध्ये अबेटमेंट सेट असाईड करण्याकामी योग्य ते कारण नमुद केलेले नाही. परंतु, दाव्याच्या अंतिम गुणदोषावर न्यायनिर्णय होण्याकामी वारस अभिलेखावर असणे न्यायोचित आहे, झालेला उशिर खर्च देऊन बाजूला करता येऊ शकतो. अशा परिस्थितीत अर्ज मंजूर होणे न्यायोचित ठरते, झालेल्या उशिराबाबत रक्कम रुपये ३००/- खर्च देणे न्यायोचित ठरते. यावरुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

आदेश

०१. अर्जदार यांचा नि.क्र. ६९ लगतचा अर्ज रक्कम रुपये ३००/- (रक्कम रुपये तीनशे फक्त) प्रतिवादी यांना देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र.४ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

०३. दोन्ही पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by AARISH SAIFODDIN SHAIKH
Date: 2026.06.11 16:21:31 +0530

दिनांक- ११/०६/२०२६.

**(ए. एस. शेख)**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | A. S. Shaikh<br>4th Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 4) Daund. |
| Order / Judgment date | :- | 11/06/2026. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 11/06/2026. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 11/06/2026. |